**L.C. BILL No. XXII OF 2026.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA FRUIT NURSERIES AND SALE OF FRUIT PLANTS (REGULATION) ACT, 1969.

**सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २२.**

**महाराष्ट्र फळांचे रोपमळे आणि फळांच्या रोपांची विक्री (नियमन) अधिनियम, १९६९, यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानपरिषदेने दिनांक १० जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

महा.१९६९ चा ४५.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी महाराष्ट्र फळांचे रोपमळे आणि फळांच्या रोपांची विक्री (नियमन) अधिनियम, १९६९ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र फळांचे रोपमळे आणि फळांच्या रोपांची विक्री (नियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

(शा.म.मु.) एचबी ०९५४–१ (४०५–७-२०२६)

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम १४ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र फळांचे रोपमळे आणि फळांच्या रोपांची विक्री (नियमन) अधिनियम, १९६९ याच्या कलम १४ मध्ये,— १९६९ चा महा. ४५.

(१) "त्या व्यक्तीस, दोषसिद्धीनंतर" या मजकुराने सुरू होणाऱ्या, आणि "पाच हजारापर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा करण्यात येतील" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"त्या व्यक्तीस, दोषसिद्ध झाल्यावर,—

(एक) पहिल्या अपराधासाठी, पंधरा हजार रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल;

(दोन) दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या अपराधासाठी, सहा महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पंचवीस हजार रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल, अथवा या दोन्ही शिक्षा होतील;";

(२) समास टिपेतील, "शास्ती" या मजकुराऐवजी, "अपराध" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र फळांचे रोपमळे आणि फळांच्या रोपांची विक्री (नियमन) अधिनियम, १९६९ (१९६९ चा महा. ४५) हा, कृषी उत्पादन पिकवणाऱ्यांना व त्याची सुरक्षा करणाऱ्यांना मूळ अभिजात फळांच्या रोपांच्या पुरवठ्याची सुनिश्चिती करण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र राज्यात, फळांच्या रोपमळ्यांना अनुज्ञप्ती देण्यासाठी व त्यांचे नियमन करण्यासाठी आणि फळांच्या रोपांची विक्री करण्यासाठी तरतूद करण्याकरिता अधिनियमित केला आहे. उक्त अधिनियमाच्या कलम १४ मध्ये, सध्या अशी तरतूद केलेली आहे की, जी कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करील किंवा अंमलबजावणी अधिकारी, त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करत असताना किंवा त्याची कर्तव्ये पार पाडीत असताना, त्यास अडथळा करील, त्या व्यक्तीस, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची, किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा करण्यात येईल अथवा या दोन्ही शिक्षा करण्यात येतील.

**२.** अधिनियमांच्या तरतुदींच्या किरकोळ उल्लंघनाचे निर्गुन्हेगारीकरण करणे हे, शासनाचे प्रमुख प्राधान्याचे धोरण आहे. व्यवसाय सुलभतेस चालना देण्यासाठी किरकोळ व तांत्रिक नियमनकारी उल्लंघनांसाठीची शिक्षा कमी करणे, हा शासनाचा हेतू आहे. उक्त अधिनियमाच्या कलम १४ मध्ये, त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अपराधांसाठी, कारावासाची किंवा द्रव्यदंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षांची तरतूद आहे. पहिल्या उल्लंघनाच्या बाबतीत, कारावासाची शिक्षा काढून टाकणे आणि त्याऐवजी त्यासाठी द्रव्यदंड वाढवणे आणि दुसऱ्या व त्यानंतरच्या उल्लंघनांसाठी सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची, किंवा पंचवीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा अथवा या दोन्ही शिक्षा यासारख्या आणखी कठोर शिक्षा विहित करणे इष्ट आहे, असे शासनास वाटते.

**३.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,

दिनांक ९ जुलै, २०२६.

**भरत गोगावले,**
फलोत्पादन मंत्री.

## सन २०२६ चे वि. प. विधेयक क्रमांक-२२ महाराष्ट्र फळांचे रोपमळे आणि फळांच्या रोपांची विक्री (नियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६ याचे परिशिष्ट (महाराष्ट्र फळांचे रोपमळे आणि फळांच्या रोपांची विक्री (नियमन) अधिनियम, १९६९ यातील उतारे)

### (सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-४५)

**१.** ते **१३.** *** *** ***

शास्ति १४. कोणतीही व्यक्ती,—

(अ) या कलमान्वये शिक्षापात्र ठरविण्यात आलेल्या, या अधिनियमाच्या किंवा त्यान्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाच्या कोणत्याही उपबंधाचे उल्लंघन करील, किंवा

(ब) या अधिनियमान्वये किंवा तदन्वये कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा व्यक्तीस प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा तो वापर करीत असताना किंवा तिच्यावर सोपविण्यात आलेले कोणतेही कर्तव्य बजावीत असताना त्यास अडथळा करील; तर त्या व्यक्तीस, दोषसिद्धीनंतर सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची किंवा दोन्ही शिक्षा करण्यात येतील.

**१५.** ते **२१.** *** *** ***

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २२. ]**

**[ महाराष्ट्र फळांचे रोपमळे आणि फळांच्या रोपांची विक्री (नियमन) अधिनियम, १९६९, यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. भरत गोगावले,**
फलोत्पादन मंत्री.**]**

**(विधानपरिषदेने दिनांक १० जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**डॉ. विलास आठवले,**
सचिव ( ३ ),
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.